# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

" स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या पंचवार्षिक बृहत आराखडयातील शै.व. २०२६–२०२७या वार्षिक योजनेमध्ये नवीन ठिकाणे व नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम याचा समावेश करणेबाबत"

संदर्भ:–उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण–२०२५/ई–१११२४८२/विशि ५ दि. ०६/०८/२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधी शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण संस्था प्रमुख, उदयोगपती, प्राचार्य, संशोधन संस्था प्रमुख, शिक्षकवृंद यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत (नांदेड, लातुर, हिंगोली, परभणी या जिल्हयातील) कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापनशास्त्र, तसेच रोजगाराभिमुख, कौशल्य विकास अभ्यासक्रम व नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमाचे नवीन महाविद्यालये सुरु करणेबाबत तसेच ग्रामीण व आदिवासी भागासाठी सॅटेलाईट केंद्राचे स्थळबिंदु (अभ्यासक्रमासह) इ. साठी विविध घटकाकडून सूचना मागविण्यांत येत आहेत. पंचवार्षिक बृहत आराखडयात वार्षिक योजना २०२६–२०२७ विविध अभ्यासक्रम व कार्यक्षेत्रातील ठिकाणे समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी नवीन महाविद्यालये, पारंपारिक किंवा अपारंपारिक अभ्यासक्रमाबाबत प्रस्तावित ठिकाणांच्या शैक्षणिक गरजा, भौगोलिक परिसर, लोकसंख्या, सामाजिक परिस्थिती, बदलते तंत्रज्ञान, भविष्यातील गरज तसेच आदिवासी, डोंगराळ/दुर्गम भागातील गरजा व अडचणी यांचा विचार करुन व्यवसाय तथा रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना प्राधान्य देत आपल्या सविस्तर सूचना, माहिती, प्रस्तावित ठिकाण (स्थळबिंदू) याबाबत सर्व तपशीलासह अर्ज सादर करावेत. (महाविद्यालय स्थळ, अभ्यासक्रम, सुरु करावयाच्या सुचना )

संदर्भीय शासन पत्रानुसार सन २०२६–२७ या वार्षिक बृहत आराखडा तयार करताना **BBA/BCA/BMS/B.Design/ B.Fashion Design** यांचा समावेश करण्यात येणार नाही असे कळविले आहे. त्यामुळे **BBA/BCA/BMS/B.Design/ B.Fashion Design** या अभ्यासक्रमास प्रस्तावित ठिकाण/स्थळ बाबत अर्ज करु नयेत.

तसेच, संदर्भीय शासन पत्रानुसार सद्यस्थितीत नवीन समाजकार्य महाविद्यालयांना मान्यता देणेबाबत शासनाचे कोणतेही धोरण नसल्याने, शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करिताच्या वार्षिक बृहत आराखडयात नवीन समाजकार्य महाविद्यालयांच्या **(BSW&MSW)** स्थळबिंदूंचा समावेश करण्यात येणार नाही असे कळविले आहे. त्यामुळे **(BSW&MSW)** या अभ्यासक्रमास प्रस्तावित ठिकाण/स्थळ बाबत अर्ज करु नयेत.

मा. कुलसचिव, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड यांचेकडे दि. ११/०८/२०२५ पर्यंत प्रत्यक्ष अथवा ई–मेल द्वारे **(affiliation@srtmun.ac.in)** अर्ज (सर्व तपशीलासह) सादर करण्यात यावा. यानुषंगाने 'उच्च शिक्षणाचा बृहत आराखडा–सर्वसाधारण निकष' समिती अहवाल विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेस्थळावर उपलब्ध आहे.

टिप: बृहत आराखडयातील वार्षिक योजने बाबत वेळावेळी दिल्या जाणा–या सूचना यापूढे केवळ विद्यापीठाच्या संकेतस्थळावरच **(www.srtmun.ac.in)** प्रसिध्द करण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

संदर्भ क्र. शैक्षणिक/संलग्न/२०२५–२६/ 577
दिनांक : ०७/०८/२०२५

कुलसचिव